समारोप

या प्रकरणात, रंगभूमी नियतकालिकातील नाट्यविचाराचा विभागश: परामर्ष घेतला. यातील सर्वच लेख, सांगोपांग, विस्तृत चर्चा करणारे आहेत, असे नव्हे. पण ज्यामध्ये, काळाच्या तुलनेने पुढे गेलेला विचार आहे, नेमके मर्म व्यक्त करणारा विचार आहे, त्या लेखाचा, तेवढ्यापुरता विचार येथे केलेला आहे. नाट्यलेखन व त्याचा प्रयोग या दोन्हीबाबतची चर्चा या लेखांमध्ये आहे. ज्या काळात, मराठी नाट्यसमीक्षा, स्वत:चा आकार, रूप शोधण्याच्या प्रयत्नात होती, त्याकाळात व्यक्त झालेले हे विचार नाटक या कलाप्रकाराच्या मूलतत्त्वांना भिडणारे आहेत, हे, या लेखांचे वैशिष्ट्य आहे. नाटक एक कला व व्यवसाय या दोन्हीची सांगड घातली जाणे आवश्यक आहे हा संस्कार या लेखांमधून होतो. नायकाचे वाङ्मयमूल्य व प्रयोगमूल्य हे परस्परनिगडित असते. नाटके, लोकांपर्यंत पोहोचावीत म्हणून, नाटक या वाङ्मयप्रकाराचे हे वैशिष्ट्य ध्यानात घेणे जरूर आहे ही गोष्ट यातून सूचित होते. नाट्यकलेची सुधारणा करण्याची जबाबदारी ही सामूहिक आहे. या गोष्टीकडे यापूर्वी कोणी लक्ष वेधलेले नव्हते. नट, नाटककार, प्रेक्षक या तिघांपैकी एका घटकावर ही जबाबदारी टाकण्याची वृत्तीही काही लेखांतून दिसते. परंतु या चर्चेतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, नाट्यकलेत सुधारणा होणे आवश्यक आहे याची गरज वाटली, आणि त्यासंबंधी विचार व्यक्त करावेसे वाटले, हा आहे. नाटक हे लोकशिक्षणाचे एक माध्यम आहे, ही दृष्टी 'ंरगभूमी काळात प्रभावी होती. त्यामुळे नीतिसंस्कार, समाजसुधारणा हा नाटकाचा हेतू असावा, तोच परिणाम नाटकांद्वारे घडून यावा अशी अपेक्षा दिसते. समाजमनावर परिणाम करण्याचे, नाटक हे एक प्रभावी साधन आहे, याची जाणीव झाली पण त्याचे कलामूल्य मात्र क्वचितच उमगले. नाटकाकडें Piece of Art या दृष्टीने पाहाता आले पाहिजे हा विचार रंगभूमी नियतकालिकात आलेला आहे, पण तो अपवादात्मकच म्हणावा लागतो. कुलीन स्त्रियांनी रंगभूमीवर भूमिका कराव्यात की करू नयेत या प्रश्नाच्या चर्चेचा सूर स्त्रीविरोधी आणि स्त्रियांवर अन्याय करणारा आहे. श्री. कृ. कोल्हटकर यांच्यासारख्या सुधारणावादी लेखकानेसुद्धा गुळमुळीत मतप्रदर्शन केले आहे. श्री. शं. बा. मुजुमदार यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या व्यक्तीलासुद्धा याबाबतीत, काळाची पावले ओळखता आलेली नाहीत. स्त्रियांनी, नाटकांवरील अभिप्राय व्यक्त करण्यात मागे राहू नये असे प्रतिपादन करणाऱ्या श्री. मुजुमदारांचा, स्त्रियांनी भूमिका करण्याला मात्र विरोध आहे. श्री. पु. रा. लेले आणि ' वृंदावनविहारी यांनी तर अतिशय प्रतिगमी आणि

अन्यायकारक विधाने केलेली आहेत. ' मराठी नाटके आणि नाटकमंडळ्या या श्री. बळवंत हरि पंडित यांच्या निबंधात, नाट्यसंगीत, नाटकाचे कार्य, नाटकाची अखेर, भाषांतरित-रुपांतरित नाटकांच्या, तसेच ऐतिहासिक नाटकांच्या भाषेचा-विचार, असे अनेक मुद्दे, विस्तृतपणे चर्चिले गेले आहेत. त्यातील अचूकता, मौलिकता प्रशंसनीय वाटते.
' नाटकातील देखावे हा श्री. महादेव गोविंद कानिटकर यांचा निबंध, त्यांच्या, या विषयातील सूक्ष्म जाणकारीचा प्रत्यय देतो. कलेविषयीची त्यांची सखोल समज त्यातून व्यक्त झाली आहे. रंगभूमी नियतकालिकात १९०७ पासूनच्या सर्वच संमेलनाध्यक्षांची भाषणे यावयास हवी होती, पण तशी ती आलेली नाहीत, पण जी आहेत, त्यापैकी निवडक भाषणांचा विचार येथे मांडला. रे. टिळक यांचे व श्री. मुजुमदार यांचे भाषण अधिक विचारप्रवर्तक आहे. या सर्वच भाषणांमधून तत्कालीन नाट्यसृष्टीचे चित्र डोळ्यापुढे उभे राहते, नाट्यविषयक प्रश्न, समस्या यांची चर्चा येते, वादग्रस्त विषयांवर अधूनमधून मते व्यक्त केलेली दिसतात. नाट्यक्षेत्रातील नामवंत अशा विद्वानांनी, अध्यक्षपदावरून व्यक्त केलेले हे विचार असल्यामुळे त्यांना ऐतिहासिक महत्त्व आहे.

रंगभूमी नियतकालिकाचे, सर्वस्पर्शी, भरीव स्वरूप, या प्रकरणात आढावा घेतलेल्या लेखांवरून, भाषणांवरून दृष्टोत्पत्तीस येण्यास हरकत नाही.

भारत नाट्य समाजाची संमेलने, अहवाल व अध्यक्षीय भाषणे

रंग. व.१ अं.१० मे १९०८ भा.ना. संमेलन ४ पृष्ठ १ ते १२
रंग. व.२ अं.८/९/१० मार्च/एप्रिल/मे १९०९ भा.ना. संमेलन ५ पृ.१ ते ३६
रंग. व.३, अं.११, जून १९१० भा.ना. संमेलन ६ पृ.१ ते ३२
रंग. व.४, अं.२, फेब्रु. १९११ भा.ना. संमेलन ६ पृ.३३ ते ४८
रंग. व.४, अं.३, मार्च १९११ भा.ना. संमेलन ६ पृ.४९ ते ७२

रंग. व.४, अं.५, मे १९११	भा.ना. संमेलन ७	पृ.१ ते १६
रंग. व.५, अं.२, जून १९१२	भा. ना. संमेलन ८	पृ.१ ते ४
रंग. व.५, अं.५/६, डिसें. १९१२	भा. ना. संमेलन ८	पृ.१ ते १५
रंग. व.५, अं.८, जुलै १९१३	भा. ना. संमेलन ९	पृ.१ ते ३४
रंग. व.६, अं.२, जुलै १९१४	भा. ना. संमेलन १०	पृ.१ ते ८
रंग. व.६, अं.७, डिसें. १९१५	१) भा. ना. संमेलन ११	पृ.१ ते ४
	२) अध्यक्षीय भाषण	पृ.१ ते २२
रंग. व.६, अं.९/१०, १९१६	भा. ना. संमेलन १२	पृ.१ ते २८
रंग. व.७, अं.३/४	१) भा. ना. संमेलन १३	पृ.१ व २
	२) १३व्या संमेलनाचा वृत्तांत	पृ.३ ते २०
रंग. व.७, अं.५/६/७	१) भा. ना. संमेलन १४वे अध्यक्षीय भाषण	पृ.१ ते २२
	२) १४व्या संमेलनाविषयी संपादकीय मजकूर	पृ.१ ते ३
रंग. नवी आवृत्ती, अं.४/५ जुलै १९२७	भा.ना.संमेलन २२	पृ.१ ते ८